**शपथेवर पुढील सरतपास श्री. खंडारे अधिवक्ता अर्जदारा तर्फे :—**

०५. शपथपत्र नि.क्र. यु—०९ मला दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझे सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. कागदपत्र यादी नि. यु—२ सोबत अनु. क्रं. ०१ ते ०३ वर मी गैरअर्जदारा तर्फे पारीत आस्थापना आदेश क्रं. ६४८/२०२२ ची प्रत, पगाराची प्रत व दिनांक १५.०३.२०२३ रोजी उपदानाची रक्कम मीळण्याकरीता दिलेल्या अर्जाची स्थळ प्रत सादर केलेली आहे. सदर स्थळ प्रतीवर माझी सही आहे व त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. कागदपत्र यादी यु—२ सोबत अनु. क्रं. १ ते ३ वरील दस्त गैरअर्जदार याना मान्य आहेत. सदर यादी यु—२ सोबत अनु. क्रं १ ते ३ दस्ताना **नि. यु— १०, यु—११, व यु—१२** देण्यात आले.

पुढील सरतपास पूर्ण.

**उलट तपास श्री देशपांडे अधिवक्ता गैरअर्जदारा तर्फे** :—

०६. उपदानाची रक्कम मीळण्याकरीता प्रत्येक वर्षाला २४० दिवस सलग काम करणे आवश्यक आहे. बीन पगारी रजेची गणना उपदानामध्ये घेतली जात नाही. सन १९९४ ते २००५ या कालावधीमध्ये मी कीती दिवस कर्तव्यावर हजर होतो हे दर्शवीण्यासाठी मी कोणताही दस्ताऐवज अभीलेखावर दाखल केलेला नाही. गैरअर्जदार यांचेकडून मला ४,४५,२००/— प्राप्त झालेले आहे. महामंडळाकडून मला उपदानाची रक्कम कमी मीळाली याबाबत मी महामंडळाकडे आक्षेप घेतलेला नाही. हे म्हणने खरे नाही की मला प्राप्त झालेली उपदानाची रक्कम ही योग्य असल्याने मी आक्षेप घेतलेला नाही. हे म्हणने खरे नाही की मी माझे शपथपत्रात उपदानाच्या रकमेचे वीवरण दिलेले नाही. दिनांक ०१.०४.२०२० पासून जाहीर करण्यात आलेल्या वेतनवाढीबाबत मी महामंडळाच्या परिपत्रकाची छायांकीत प्रत सादर केलेली आहे. सदर परपित्रकाबाबत वाद नसल्याने त्यास **नि. यु—१३** देण्यात आले. माझा शेवटचा

पगार रुपये ३३९२३/— होता हे दर्शवीण्यासाठी मी पगारपत्रकाची प्रत अभीलेखावर दाखल केलेली आहे. मी महामंडळाकडे हजेरी पत्रकाची मागणी कधीही केलेली नाही. मी माझे सेवापुस्तीकेची प्रत अर्जासोबत दाखल केलेली नाही. दिनांक ०१.०४.२०२० पासून झालेली वेतनवाढ मला दिलेली नाही. हे म्हणने खरे नाही की मला उपदानाची पूर्ण रक्कम मीळालेली आहे. हे म्हणने खरे नाही की मी उपदानाची प्रस्तूत अर्जात केलेली मागणी चुकीची आहे. हे म्हणने खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

सरतपासण पुर्ण

उलटतपास करीता तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा/—

(अ. दा. तिडके)
न्यायाधीश
कामगार न्यायालय, चंद्रपुर.

दि. ०५.०८.२०२५.